प्रकरण पहिले

# भारत-अमेरिका संबंधाचा आढावा

# प्रकरण पहिले
# भारत अमेरिका संबंधाचा आढावा

'आंतरराष्ट्रीय राजकारण' हा विषय राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक महत्वाचा नवीन व स्वतंत्र विषय आहे. आंतरराष्ट्रीय संबंधावरून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप ठरत असते. दोन देशातील भौगोलिक अंतर कितीही असले तरी आजच्या जगात हे अंतर दळणवळणाच्या भिन्न-भिन्न साधनाने कमी झाले आहे. याचा परिणाम म्हणजे जगातील कोणत्याही कोप ऱ्यात घडणारी घटना संपूर्ण जगावर परिणाम करीत असते. असे असले तरीसुद्धा आज जगातील राष्ट्रे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे एकमेकांवर अवलंबून असलेली दिसतात. यामुळेच सद्यकालीन जगात आंतरराष्ट्रीय संबंधाना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधानाच आंतरराष्ट्रीय राजकारण असेही संबोधले जाते.

आंतरराष्ट्रीय समुदायातील सार्वभौम राज्यांमध्ये त्यांच्या हितसंबंधाबाबत साम्य आढळत नाही. या हितसंबंधानाच त्या त्या राष्ट्राचे राष्ट्रीय हित (National Interest) असे म्हणतात. ही राष्ट्रे आपले राष्ट्रीय हित साध्य करीत असताना परस्परांशी कधी सहकार्य तर कधी संघर्ष करतात. याच कारणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला सार्वभौम राज्यांच्या परस्परांतील किया व प्रतिकीयांचा अभ्यास करणारे शास्त्र मानले जाते.

**आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संकल्पना :- व्याख्या :-**

1. " आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष व सत्तेचा वापर करण्याचा प्रयत्न होय."[1]

-हंन्स.जे.मॉर्गेथॉ.

2. " आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे स्वतंत्र राजकीय समाजाचे उद्देश किंवा हितसंबंध याच्याबाबत परस्परांतील विरोध व संघर्षामुळे निर्माण होणाऱ्या क्रिया व प्रतिक्रियांचा अभ्यास होय."[2]

-हेरॉल्ड व मागरिट स्प्राऊट.

अशा प्रकारे हंन्स. मॉर्गेन्थॉ आणि हेरॉल्ड व मागरिट स्प्राऊट यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाची संकल्पना स्पष्ट केली आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती मोठी असून त्यात आंतरराष्ट्रीय राजनीती, आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध, आंतरराष्ट्रीय कायदे व आंतरराष्ट्रीय संघटन राजनतीक संबंध, आंतरराष्ट्रीय संबंधाचा इतिहास व राजकीय भुगोल या बाबींचा ही अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. या आधारे भारत-अमेरिका संबंधांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

भारत-अमेरिका या देशाना फार मोठी प्राचीन परंपरा आहे. या देशांना ब्रिटिश साम्राज्य शाहीचा कटू अनुभव आहे. अमेरिकेचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा होता. अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणादायी ठरला होता. शिवाय स्वातंत्र्य

चळवळ सुरू असताना भारतीय नेत्यांनी अमेरिका दौरा काढून स्वातंञ्य चळवळीला पाठिंबा मिळविला होता. राष्ट्राध्यक्ष एफ.डी. रूझवेल्टना भारतीय स्वातंञ्याचा प्रश्न जीव्हाळयाचा वाटत होता. पण अमेरिका-इंग्लंड युध्द्कालीन दोस्त राष्ट्र असल्यामुळे रूझवेल्ट इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांच्यावर फारसा दबाव टाकू शकले नाहीत, पण त्याचा नैतिक पाठिंबा मोठा होता. पण शीतयुध्द् कालखंडात 1949 पर्यंत भारत-अमेरिका संबंधात विशेष प्रगती होवू शकली नाही. या काळात अमेरिका साम्यवाद व युरोपच्या प्रश्नात गुंतून गेली होती. शीतयुध्द्ाची तीव्रता वाढत होती. या काळात अमेरिका स्वत:ची स्थिती मजबूत करण्यात आणि जागतिक राजकारणात एक महाशक्ती म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यात गुंतून गेली होती. त्यामुळे त्यांना भारताबरोबर संबंध सुधारण्यात रस नव्हता. या काळात भारत ही स्वातंञ्य चळवळीत गुंतला होता. पंडीत नेहरूंना दोन्ही देशाचे संबंध सुधारण्याची गरज तीव्रतेने जाणवत होती. पण संबंध सुधारण्यात काळाची बंधनेच मोठी होती.

पण पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी 2 सप्टेंबर 1946 रोजी हंगामी सरकारची सुत्रे हाती घेताच अमेरिकेबरोबर मैत्रीपुर्ण संबंध ठेवण्यासंबंधी इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार फेब्रुवारी 1944 मध्ये श्री. 'आसफ अली' याना भारताने आपले अमेरिकेतील राजदूत म्हणून पाठविले होते. त्याच्या नंतर जुलै 1949 मध्ये श्रीमती 'विजया लक्ष्मी पंडीत' यांना अमेरिकेत भारतीय राजदूत म्हणून पाठविले. हे दोन विशेष प्रयत्न करूनही संबंधात फारशी सुधारणा झाली

नाही. यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नेहरूंनी 2 ऑक्टो. 1949 रोजी अमेरिकेला पहिली भेट दिली. पण या भेटीत काहीच साध्य होवू शकले नाही. अमेरिकेत काँग्रेसपुढील भाषणात ते म्हणतात, "भारताची बांधिलकी जरी अलिप्ततावादी विचारांची असली तरी जेंव्हा लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या रक्षणाचा प्रश्न येईल तेंव्हा भारत अलिप्त राहणार नाही"[3] अशा प्रकारे नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणाची दिशा स्पष्ट केली नाही.

पण दरम्यानच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वपूर्ण बदल घडत होते. हा काळ होता दुस्या महायुध्द्ानंतरचा. या काळात युरोप आणि आशिया खंडामध्ये साम्यवादाचा प्रसार रोखणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सुत्र बनले होते. युध्द्ाची झळ बसलेल्या युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी अमेरिकेने ट्रूमन आणि मार्शल योजना सारख्या धोरणाचा पुरस्कार केला. पण आशिया-आफ्रिका खंडामध्ये नवस्वतंत्र राष्ट्रांना साम्यवादापासून दूर ठेवणे अमेरिकेसाठी गरजेचे होते. या राष्ट्राच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा सोविएत रशिया उचलण्याची भीती अमेरिकेला होती. त्यामुळे अमेरिकेला आशिया खंडामध्ये आपल्या साम्यवाद विरोधी धोरणाचे प्रतिनिधीत्व करेल असा सहकारी हवा होता. दुस्या महायुध्द्ाच्या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ.डी.रूझवेल्ट यांना अमेरिकेची ही गरज चीन पूर्ण करू शकेल असे वाटले. परंतू चीनमध्ये साम्यवादी क्रांती यशस्वी झाल्यानंतर अमेरिकेचे स्वप्न भंग पावले. त्यामुळे आता सोविएत रशिया बरोबरच चीनवर नियंत्रण

ठेवणारी समतूल्य सत्ता असणे ही अमेरिकेची महत्वाची गरज होती. त्याकाळात ही गरज पूर्ण करू शकणारी दोनच राष्ट्रे होती. एक भारत दुसरा जपान त्यामुळे स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताला आशिया खंडातील अमेरिकेच्या साम्यवादविरोधी धोरणामध्ये समाविष्ट करून घेण्याचे प्रयत्न चालू झाले होते. या आधारावर संबंध सुधारण्याची अपेक्षा केली जात होती. पण पंडीत नेहरू यांनी आखलेले भारतीय परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या इच्छेविरूध्द् होते. नेहरूंची विचारसरणी अलिप्ततावादाची असली तरी त्याचा कल सोविएत रशियाकडे होता. याचा प्रत्यय लगेचच आला. "पूर्व युरोपमधील चेकोस्लोव्हकिया, हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया यासारख्या देशाना जबरदस्तीने साम्यवादी बनविण्याचा प्रयत्न सोविएत रशियाकडून झाला, तेंव्हा भारताकडून कोणताही निषेध झाला नाही." यामुळे भारत- अमेरिका संबंधात तणाव निर्माण झाला. नेहरूंचे हे धोरण सोविएत रशियाकडे झुकणारे असूनही अमेरिकेने नेहरूंचे मन वळविण्याचा प्रयत्न चालूच ठेवला होता.

नेहरूंच्या काळात भारत-अमेरिका संबंधात तणाव निर्माण करणारे प्रश्न अनेक होते. अंतर्गत प्रश्न ही भेडसावत होते. याचा परिणाम दोन्ही देशाच्या संबंधावर झाला. कश्मीर समस्या भारताच्या स्वातंत्र्यापासुनच निर्माण झाली. शीतयुध्द्राच्या पार्श्वभूमीवर ही समस्या जास्तच चिगळली. "काश्मीरचे भौगोलिक स्थान महत्वाचे आहे काश्मीरच्या माध्यमातून चीन, सोविएत रशिया आणि भारताच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणे अमेरिकेला शक्य होणारे होते.

म्हणून काश्मीर स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास यावे ही अमेरिकेची इच्छा होती."[4] त्यामुळे कश्मिरमध्ये चालू असलेल्या चळवळीला 'स्वातंञ्ययुध्द्' म्हणून अमेरिकेने संबोधले. " काश्मीरचे भारतातील विलीनीकरण हे बेकायदेशीर असून हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेने घेतलेल्या ठरावाच्या आधारावर सार्वमताच्या माध्यमातून सोडविला जावा"[5] अशी भूमिका अमेरिकेने घेतल्यामुळे तणावात भर पडली.

सन 1949 मध्ये माओ-त्से-तुग याच्या नेतृत्वाखाली चीन साम्यवादी राष्ट्र म्हणून उदयास आले. भारताच्या दृष्टीकोनातून चीनचे महत्व लक्षात घेवून नेहरूंनी डिसेंबर 1949 मध्ये चीनला मान्यता दिली. यावर ट्रूमन प्रशासन नाराज झाले. सोविएत रशियाच्या साम्यवादी धोरणाला पाठिंबा देणारे कृत्य असून जगात साम्यवादाला प्रोत्साहन मिळेल अशी भिती व्यक्त केली. यामुळे तणावात भर पडली. कोरिया संघर्ष 1950 मध्ये निर्माण झाला. भारताने प्रथम उत्तर कोरियास आक्रमक ठरवून एक प्रकारे अमेरिकेचे समर्थन केले. पण नंतर अमेरिकेने कोरिया प्रश्नाचा उपयोग चीनला शह देण्याचे साधन म्हणून केला. अमेरिकन सैन्याने $38^0$ अक्षांस ओलांडून जाण्याचा निर्णय घेतला त्यावेळी भारताने अमेरिकेला विरोध केला. शिवाय "Uniting for peace Resolution" या प्रस्तावावर कडक शब्दात टीका केली. यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

सन 1953 साली अमेरिकेत सत्तांतर घडून आले. यानंतर अमेरिकेच्या अध्यक्षपदी "डिवट डेव्हिड आयसेन हॉवर" यांची निवड झाली.

हॉवर प्रशासनाने भारतास जाणीवपूर्वक आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडण्याचा, पश्चिमेतर जगावरील नेहरूंचा प्रभाव कमी करण्याचा आणि तिसऱ्या जगाच्या राष्ट्रवादाचे प्रवक्ते म्हणून त्यांचे पंख छाटण्याचा प्रयत्न केला. भारतास पाश्चिमात्य राष्ट्रांची सहानुभूती, संयुक्त राष्ट्र संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांचा पाठिंबा मिळू नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. या काळातील नेहरू यांचे धोरण सोविएत रशियाकडे झुकणारे असूनही अमेरिकेने नेहरूंचे मन वळविण्याचा प्रयत्न चालूच ठेवला होता. सन 1954 मध्ये हॉवर प्रशासनाने "भारताला आर्थिक व लष्करी मदतीची तयारी दर्शविली होती मात्र नेहरूंनी नकार दिला"[6] याचा परिणाम म्हणून मे 1954 मध्ये अमेरिका आणि पाकिस्तानने संरक्षण करार केला. पाकिस्तान सिएटो-सेन्टो या लष्करी करारातही सामील झाला यामुळे पाकिस्तानला आर्थिक व लष्करी मदतीचा ओघ सुरू राहिला. या मदतीने आशियातील सत्ता संतुलन ढासळू लागले. त्यामुळे अमेरिकेच्या या धोरणावर भारताने कडक टीका केली.

नेहरूंनी आपल्या कार्यकालात सोविएत रशियाबरोबर मैत्रीपूर्ण संबंध वृध्दींगत केले. सन 1955 मध्ये नेहरू यांनी रशिया दौरा केला यानंतर रशियन नेते खुश्चेव आणि बुल्गनिन यांनी भारत भेट दिली. या सर्वाचा परिणाम 'भारत रशिया भाई-भाई' ची घोषणा झाली. यामुळे अमेरिका अधिकच नाराज झाली. सन 1954 नंतर अमेरिका काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानचे खुले समर्थन करू लागली तर रशिया भारताचे समर्थन करू लागला. तणाव वाढत

असतानाच सन 1956 'सुएझ कालवा' प्रश्नावर भारताने अमेरिकेचे समर्थन केले. त्यामुळे संबंधात सुधारणा झाली. यानंतर सन 1959 मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती 'आयसेन हॉवर' यानी भारताला भेट दिली. यामुळे संबंधात मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण झाले.

सन 1961 ला जॉन.एफ.केनेडी याची अध्यक्षपदी निवड झाली. केनेडी खऱ्या अर्थाने भारताचे मित्र होते. त्यांना भारताविषयी आस्था आणि नेहरूंविषयी आदर होता. शीतयुद्धोत्तर काळात भारत-अमेरिका संबंध सर्वाधिक मैत्रीपूर्ण केनेडी याच्या काळात राहिले. केनेडी प्रशासन काळात अमेरिकेचा तिसऱ्या जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोणात मुख्यत्वेकरून भारत धोरणात बदल झाला. भारत एक जागतिक सत्ता बनू शकते, साम्यवादास रोखण्यास आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या अमेरिकी प्रयत्नात वाटेकरी होवू शकते, या व्यापक भावनेतून केनेडींनी अमेरिका-भारत राजकीय, आर्थिक संबंध वृध्दींगत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तरीही काही गोष्टी तणाव निर्माण करणाऱ्या ठरल्या. गोवा प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावा अशी इच्छा नेहरूंची होती, त्यामुळे सर्व विधायक मार्ग चोखाळून झाल्यावर त्यांनी लष्करी बळावर गोवामुक्त करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेला याची माहिती होताच "भारताने सहा महिने लष्करी मोहिम पुढे ढकल्यास पोर्तुगालवर राजकीय दडपण आणून त्यास स्वखुशीने गोवा सोडण्यास भाग पाडेल असे राजकीय आश्वासन दिले."[7] पण संरक्षण मंत्री कृष्ण मेननची चर्चेची वेळ निघून गेल्याची भूमिका घेतली. पण यामुळे अमेरिका

पेचात पडली. वसाहतवाद विरोधातून भारताचे आणि नाटोच्या सदस्यत्वामुळे पोर्तुगालचे समर्थन करण्याची पाळी आल्याने गोव्याच्या प्रश्नावरून केनेडी द्विधा मनस्थितीत होते. 17 डिसेंबर 1961 रोजी भारताने गोव्यावर आक्रमण करून 24 तासातच गोव्यास पोर्तुगालांच्या जोखंडातून मुक्त केले. संयुक्त राष्ट्रात गोवा प्रश्नावरून अमेरिकेने भारतावर टीका केली. यामुळे तणाव निर्माण झाला. नेहरूंनी अमेरिका भेटीत केनेडींना गोवा लष्करी कारवाईची पूर्व कल्पना दिली नसल्यामुळे परस्पर संशयाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर दोन्ही देशाच्या संबंधात सुधारणा घडवून आणणारी महत्वपूर्ण घटना घडली. 20 ऑक्टो. 1962 रोजी 'नेफा' आणि 'लडाख' विभागात चीनने मोठया प्रमाणावर आक्रमण केले. लडाखमधील 30 हजार चौरस किलोमीटर आणि नेफामधील 21 हजार चौरस किलोमीटरचा भाग व्यापला हा भारताचा मोठा पराभव होता. नेफामध्ये चीन तीन आठवडयात मजबूत स्थितीत होता. त्यामुळे आसामच्या पठारी प्रदेशाला मोठा धोका निर्माण झाला. यामुळे भारत सरकार मोठया कात्रीत सापडला. भारत सरकारने मित्र राष्ट्राकडून मदतीचा निर्णय घेतला. 27 ऑक्टो. रोजी सर्व महत्वाच्या देशाच्या प्रमुखांना चीन विरूध्द सहाय्य करण्याची विनंती केली. अशा संकटाच्या काळात फक्त अमेरिकेनेच मदतीचा हात पुढे केला. 17 नोव्हेंबर पर्यंत आवश्यक सर्व शस्त्रास्त्रे भारतात येवून पोहचली. नेहरूंनी अमेरिकेकडे हवाई संरक्षणाची ही मागणी केली पण नोव्हेंबर 22 रोजी चीनने एकतर्फी माघार घेवून युध्दबंदी

घोषित केली. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली. अमेरिकेने कठीण प्रसंगी भारताला मदत केल्यामुळे संबंध सुधारले. केनेडी प्रशासनाने भारताला लष्कराच्या आधुनिकीकरणास मदत दिली. केनेडी प्रशासन काळ हा भारत-अमेरिका संबंधाचा मैत्रीपूर्ण काळ राहिला.

पंडित नेहरू यांनी भारत स्वतंत्र झाल्यापासून 1964 पर्यंत परराष्ट्र विभाग स्वत:कडे ठेवला. भारत- अमेरिका संबंध ब ऱ्याच वेळा तणावपूर्ण राहिले पण हे संबंध पूर्णपणे कधीच तुटले नाहीत. हे संबंध विकसीत होत असताना आर्थिक आणि व्यापारी हित संबंधांना महत्वपूर्ण स्थान होते. या काळात भारतास "AID (Agency for International Development) अंतर्गत आर्थिक साहय P.L.480 धोरणाअंतर्गत भारतास गव्हाचा पुरवठा केला. "[8] महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे डिसेंबर 1963 मध्ये दोन्ही देशांत करार होवून अमेरिकेने 'तारापूर अणूऊर्जा' प्रकल्पासाठी 8 लाख डॉलर देण्याचे मान्य केले. 30 वर्षाच्या या करारानुसार या प्रकल्पासाठी समृध्द युरेनियम इंधन देण्याचेही मान्य केले. हा करार भविष्यातील दोन्ही देशाच्या संबंधाचा मजबूत पाया होता.

या सर्व गोष्टीमुळे नेहरूं काळात भारत-अमेरिका संबंध मैत्रीपूर्ण कमी आणि तणावपूर्णच जास्त राहिले.

## लाल बहाद्दूर शास्त्री कालकाल (जून. 1964-जाने. 1966)

भारतात नेहरूं यांच्या निधनानंतर शास्त्रीजी पंतप्रधान बनले तर अमेरिकेतही केनेडी याची हत्या झाल्यामुळे अध्यक्षपदी 'लिंडन बेन्स जॉन्सन' याची निवड झाली. शास्त्री काळात 1965 मध्ये अमेरिका व्हिएतनाम युध्दात गुंतली होती. उत्तर व्हिएतनामवर बॉम्ब वर्षाव करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयावर भारताने कठोर टिका केली. 16 एप्रिल 1965 च्या शास्त्रीच्या अमेरिका भेटीवेळी शास्त्रीच्या स्वागताबाबत जॉन्सन प्रशासनाने असमर्थता दर्शविली. ही भारतास अपमानकारक घटना होती. यामुळे दोन्ही देशाचे संबंध अतिशय खालच्या पातळीवर गेले. 1965 च्या भारत-पाकिस्तान युध्दात अमेरिकेने भारताविरोधी भूमिका घेतली. या युध्दात पाकिस्तानने अमेरिकेच्या लष्करी सहाय्यातून मिळालेले 'पॅटन रनगाडे' आणि इतर शस्त्रांचा भारताविरूद्ध वापर केला. या युध्दाच्या युध्दबंदी कराराची बोलणी ताशकंद येथे झाली. यात रशियाने महत्वाची भूमिका बजावली. रशियाचा दक्षिण आशिया भागात प्रभाव वाढल्याचा अमेरिकने गैरसमज करून घेतल्याने संबंधात उदासीनता आली.

शास्त्री काळ अल्प राहिला पण या काळात अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या, ज्यामुळे दोन्ही देशाचे संबंध तणावपूर्ण बनले.

## इंदिरा गांधी कार्यकाल (1966-1977 व 1980-1984):-

शास्त्रीजीच्या आकस्मिक निधनानंतर इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. शास्त्री यांच्या काळातील तणाव निर्माण करणाऱ्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे प्रयत्न गांधी यांनी केले. गांधी यांच्या काळात भारतात मान्सूनने दंडी मारल्यामुळे भारतासमोर अन्नधान्य टंचाईचे गंभीर आव्हान निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर गांधी यांनी 28 मार्च 1966 ला अमेरिकेला भेट दिली. या भेटीत भारताला अन्नधान्याची मदत हवी होती. त्यासाठी "रूपयाचे अवमूल्यन करावे लागले, तसेच आर्थिक धोरणात बदल करून उदारीकरण, बाजाराधिष्ठित धोरणे राबवावी अशी अमेरिकेची इच्छा होती."[9] हे भारताने मान्य केल्यावर कृषी आणि औद्योगिक विकासाकरीता भरीव आर्थिक सहाय्य दिले.

'जॉन्सन' यांच्यानंतर अमेरिकेत सत्तेवर 'निक्सन' आले. निक्सनपूर्व काळात अमेरिकेचा भारताकडे बघण्याचा दृष्टीकोण वेगळा होता. आशियाच्या राजकारणात भारताचा एक प्रभावी शक्तीच्या रूपाने उदय होवून चीनला आपोआपच शह मिळेल असा अनेक अमेरिकी नेत्यांचा व्होरा होता. उपाध्यक्ष असताना निक्सन यांनी अशाच प्रकारे मत व्यक्त केले होते. मात्र राष्ट्राध्यक्ष झाल्यावर अमेरिकी परराष्ट्र धोरणात त्यांनी दूरगामी बदल केले. दक्षिण आशियास गौणत्व देवून पूर्व आशियास प्राधान्य दिले. साम्यवादी चीनशी वैरत्व सोडून मैत्री केली. यामुळे भारत-अमेरिका संबंधात दूरावा निर्माण झाला.

अशा परिस्थितीतच बांग्लादेशाचा प्रश्न निर्माण झाला. 25 मार्च 1971 रोजी 'पाकिस्तानचे लष्करी शहा याहयाखान' यानी पूर्व पाकिस्तानवर उघड-उघड अन्याय अत्याचारास सुरवात केली. या अन्याय पिडित पूर्व पाकिस्तानातील लोक भारतास शरण आले. याची संख्या "सुमारे 10 लाख होती."[10] या शरण आलेल्या लोकाचा भार भारतीय अर्थव्यवस्थेवर पडू लागला. इंदिरा गांधी यांनी या प्रश्नात लक्ष घालण्याचे अमेरिकेला विनंती केली. तसेच संयुक्त राष्ट्रसंघातही हा प्रश्न मांडला त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे इंदिरा गांधी यांनी 15 जून 1971 ला राज्यसभेत घोषणा केली की, "We will have to go though the hell to meet the challenge posed by the developments in Bangladesh."

मुक्ती वहिनीला सहाय्य देणे सुरू केले आणि 3 डिसेंबर पासून युध्दाला प्रारंभ झाला. युध्द सुरू होताच अमेरिकेने भारतास दोष दिला. यावेळी अमेरिकेने "बांग्लादेश मुक्ती संग्राम" समस्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत मांडण्याचा प्रयत्न केला पण रशियाने व्हिटो वापरल्यामुळे हा प्रस्ताव बारगळला. अमेरिकेने भारतावर दबाव आणण्यासाठी "Gun Boat Diplomacy" चा वापर करीत 7 वे आरमार हिंदी महासागरात पाठविले. 17 डिसेंबरला अण्वस्त्र सज्ज नौका बंगालच्या खाडीत पोहचल्या. भारतावर पाकिस्तानच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप केल्याची जोरदार टीका झाली. या युध्दात अमेरिकेने घेतलेल्या भूमिकेमुळे भारतात अमेरिकाविरोधी वातावरण

निर्माण झाले. त्यामुळे भारत- अमेरिका संबंध अतिशय नाजूक बनले. याशिवाय अमेरिका-पाकिस्तान-चीन मैत्री करार झाला. त्याचबरोबर 1971 च्या युध्दापासून निक्सन प्रशासनाने भारताची आर्थिक कोंडी करण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते. यात भर म्हणून चिलीच्या 'सॅलवेडॉर ॲल्डे' आणि बांग्लादेशाच्या 'रेख मुजिबर रहमान' यांच्या हत्येमध्ये सीआयए (CIA) चा हात आसण्याचा श्रीमती इंदिरा गांधी यांना संशय आला असल्याने स्वतःच्या भवितव्याबाबत त्या अस्वस्थ झाल्या.

अमेरिकेने हिंदी महासागरात सन 1972-73 मध्ये 'दिएगो-गोर्सिया' येथे नाविक तळ उभारला. या तळाला भारताने विरोध केला. यामुळे तणावात भर पडली. हा तणाव कमी करण्यासाठी "डॉ. हेन्री किसिंजर भारत दौ-यावर आले. 28 ऑक्टोबर 1974 रोजी आर्थिक, वैज्ञानिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहयोग वाढविण्यासाठी संयुक्त भारत- अमेरिका आयोगाची स्थापना केली."[12] त्यामुळे तणाव निवळण्यास सुरवात झाली. पण 18 मे 1974 रोजी श्रीमती इंदिरा गांधींनी ला अणुस्फोट घडवून आणल्यामुळे संबंधात प्रचंड तणाव निर्माण झाला.

श्रीमती इंदिरा गांधी यांचा दुसरा कार्यकाळ सन 1980-84 असा राहिला. सोविएत रशिया अंतर्गत प्रश्नात गुंतला होता. आर्थिक समस्या वाढल्या होत्या. त्यामुळे सोविएत रशिया भारताच्या आर्थिक गरजाची पूर्तता करण्यास सक्षम नव्हता. या वास्तवाचे भान इंदिरा गांधींना असल्याने त्यांनी अमेरिकेबरोबर

संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेत कार्टर सत्तेवर आल्यानंतर परराष्ट्र धोरणात बदल केला. त्याच्या नव्या धोरणानुसार "प्रादेशिक सत्ता बरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून अमेरिकेवरील वाढती आंतरराष्ट्रीय जबाबदारी कमी करण्याचे धोरण असल्याने आणि त्याच्या दृष्टीने भारत आर्थिक आणि लष्करी क्षमता असलेली उदयोन्मुख प्रोदेशिक सत्ता असल्याने अमेरिकेने भारताबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला."[13] संबंध सुधारत असतानाच अनुइंधन पुरवठा करण्यास विलंब लावत असल्याच्या कारणावरून श्रीमती इंदिरा गांधीनी जाहिर टीका केली. कार्टर यांनी ही बाब गंभीर समजून भारताबरोबर मित्रत्वाचे संबंध ठेवण्याच्या उद्देशाने आपल्या कार्यकारी अधिकाराचा वापर करीत भारतास 39.7 टन युरेनियम पुरवठा करण्यास परवानगी दिली. संबंध सुधारत असतानाच रशियाने अफगाणिस्तानमध्ये सैन्य घुसविले. भारताने याबाबत कोणतीच टीका न करता सौम्य भूमिका घेतली आणि रशियावर टीका न करता हिंदी महासागरातील अमेरिकेचे नाविक दल काही अंशी या घटनेस कारणीभूत असल्याची भूमिका घेतली. त्यामुळे अमेरिका नाराज झाली.

या काळात नवी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था आणि उत्तर दक्षिण संवाद यावरूनही दोन्ही देशात मतभेद निर्माण झाले. पण जून 1982 च्या श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अमेरिका भेटीत रगिन यांनी सहकार्याची भूमिका घेतली. यातूनच "29 जूलै 1982 रोजी अनुइंधन पुरवठयाबाबत

अमेरिका-भारतात करार झाला."[14] एकूणच इंदिरा गांधी याच्या दोन्ही कालखंडात भारत-अमेरिका संबंध कधी मैत्रीपूर्ण तर कधी तणावपूर्ण राहिले.

**इंदिरा गांधी कार्यकालाचे मूल्यमापन :-**

श्रीमती इंदिरा गांधी यांनी बांग्लादेश मुक्ती संग्रामाच्या विजयाने भारताला दक्षिण आशियात प्रभावी सत्ता म्हणून प्रस्थापित केले. श्रीमती इंदिरा गांधीनी भारतीय परराष्ट्र धोरणाला वास्तववादी रूप दिले. त्यांनी परराष्ट्रीय धोरणात आक्रमकता आणली. पंचशील धोरणानुसार इतर देशांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचे तत्व बाजूला सारून बांग्लादेश मुक्ती संग्रामामध्ये भाग घेवून वास्तववादाचा परिचय दिला. त्यामुळेच हेन्री किसिंजर हे मान्य करताना म्हणतात "अमेरिका भारताला दक्षिण आशियातील मोठी शक्ती म्हणून मान्यता देत आहे."

सन 1974 ला पोखरण येथे अणुस्फोट घेवून गांधी यांनी भारताची आण्विक तंत्रज्ञानातील प्रगतीची जाणीव जगाला करून दिली. आण्विक स्फोटानंतर अमेरिकेने घातलेल्या निर्बंधाची पर्वा न करता संतुलित विकास साधला. यामुळे भारत, लष्करी, वैज्ञानिक आणि आर्थिक सत्ता म्हणून प्रस्थापित होवू लागला. याला जगाची मान्यता मिळत गेली. इंदिरा गांधी यांच्या प्रभावी नेतृत्वाने भारत आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभावी राष्ट्र म्हणून प्रस्थापित झाला.

## मोरारजी देसाई कार्यकाल : (1978-79)

1977 च्या निवडणुकीने भारतात पहिल्यांदा बिगर काँग्रेसी सरकार मोरारजी देसाईच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. परराष्ट्र मंत्री "अटलबिहारी वाजपेयी" यांनी दोन्ही देशातील संबंध सुधारण्यावर भर दिला. दरम्यान कार्टर यांनी 1 ते 3 जानेवारी 1978 मध्ये भारतास भेट दिली. ही भेट अत्यंत भारावलेल्या वातावरणात पार पडली. त्या भेटीच्या स्मरणार्थ दिल्लीजवळील खेडयास, 'कॉर्टरपुरी' असे नाव दिले. कार्टर यांनी भारताला P.L. 480 धोरणाअंतर्गत भारतास मिळणाऱ्या 18 दशलक्ष डॉलरने वाढ केली. 1980 मध्ये वर्ल्ड बँकेकडून भारतास 12854 बिलीयन डॉलरचे कर्ज मिळाले. त्यात अमेरिकेने 27 % वाटा उचलला. यामुळे वातावरण सौदार्यपूर्ण बनले.

जून 1978 मध्ये मोरारजी भाई देसाई यांनी अमेरिकेस भेट दिली. कार्टर यांच्या काळात संबंध मैत्रीपूर्ण होत असतानाच अण्वस्त्र प्रसार बंदी करारावरून तणाव निर्माण झाला. पण एकूणच मोरारजी देसाईच्या काळात भारत-अमेरिका संबंध मैत्रीपूर्ण राहिले.

## राजीव गांधी कार्यकाल:- (नोव्हेंबर 1984 ते जून 1991)

श्रीमती इंदिरा गांधीच्या हत्येनंतर पंतप्रधानपदाची सुत्रे राजीव गांधी यांच्याकडे आली. राजीव गांधी सत्तेवर येताच अमेरिकेने स्वतःहून मदतीचा हात पुढे केला. भारताच्या संरक्षण गरजेकडे पाहत सहानुभूतीपूर्वक प्रतिसाद दिला. 12 ते 16 जून 1985 या काळात राजीव गांधी अमेरिका भेटीवर गेले.

'रीगन' यांनी भारतास आधुनिक लष्करी तंत्रज्ञान पुरवण्याचे आश्वासन देवून ते प्रामाणिकपणे पाळले. राजीव गांधी यांनी या काळात शस्त्रास्त्र खरेदीवर भर दिला. 13 जून रोजी अमेरिकेने काँग्रेसपुढे बोलताना हिंदी महासागराचे लष्करीकरण आणि शेजारी राष्ट्रास दिली जाणारी मदत यावर नाराजी व्यक्त केली. सन 1988 मध्ये भारतात मान्सूनचा अपुरा पाऊस झाल्यामुळे 21 राज्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली असणा ऱ्या जागतिक बँकेने भारतास 35 कोटी डॉलरचे कर्ज मंजूर केले.

पण 22 मे 1889 रोजी 'अग्नि' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतल्याने अमेरिका संतप्त झाली. अमेरिकेने क्षेपणास्त्र कार्यक्रम रोखण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न केले. सुपर 301 (Super 301) कायदयानुसार भारतावर निर्बंध घातले गेले. तणाव निर्माण झाला असतानाच पाकिस्तानाला Air Borne warning and control system (AWACS) f-16, लढाऊ विमाने, MI Tanks इ, आधुनिक लष्करी साधनसामुग्रीची मदत दिली. या प्रगत लष्करी सहाय्यामुळे दक्षिण आशियातील सत्तासंतुलन बिघडेल अशी स्थिती असताना अमेरिकेने त्याकडे दुर्लक्ष केले.

राजीव गांधी यांच्या काळात असे तणाव निर्माण करणा ऱ्या घटना घडल्या तरी दोन्ही देशाचे संबंध मैत्रीपूर्ण राहिले. दुष्काळी परिस्थितीत भारताला अन्नधान्याची मदत दिली. राजीव गांधी यांच्या काळात परराष्ट्र

धोरणात आक्रमकता आली. भारताने श्रीलंकेमध्ये 'शांतीसेना' पाठविली तर मालदीवला अंतर्गत बंडाळी मोडण्यास लष्करी सहाय्य दिले. भारताबरोबर मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे वरील घडामोडीबाबत अमेरिकेने अनुकूल भूमिका घेतली. यामुळे राजीव गांधी यांच्या काळात भारत- अमेरिका संबंध सौदार्यपूर्ण राहिले.

**सन 1989 ते 1998 या काळातील भारत- अमेरिका संबंध :-**

हा काळ भारतात अस्थिरतेचा काळ होता. या कालखंडात सत्तेवर अनेक अल्पमतातील अस्थिर सरकारे आली. त्यात

| | |
|---|---|
| "श्री. विश्वनाथ प्रतापसिंग | 2 डिसेंबर 1989 ते 10 नोव्हेंबर 1990 |
| श्री. चंद्रशेखर | 10 नोव्हेंबर 1990 ते 21 जून 1991 |
| श्री. पी.व्ही नरसिंहराव | 21 जून 1991 ते 16 मे 1996 |
| श्री. अटलबिहारी वाजपेयी | 16 मे 1996 ते 1 जून 1996 |
| श्री. एच.डी.देवेगौडा | 1 जून 1996 ते 21 एप्रिल 1997 |
| श्री. आय.के.गुजराल | 21 एप्रिल 1997 ते 18 मार्च 1998"[15] |

इ. अस्थिर सरकारे सत्तेवर आली. हा अस्थिरतेचा काळ असतानाच राजीव गांधी हत्या व बोफोर्स इ. प्रकरणाने भारतीय राजकारण ढवळून निघाले. या अंतर्गत परिस्थितीचा परिणाम दोन्ही देशावर होत असतानाच सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. याचे दूरगामी परिणाम भारत-अमेरिका संबंधावर झाले.

## सोविएत संघाचे विघटनः (डिसेंबर1991)

आंतरराष्ट्रीय राजकारणात ही इराण-इराक युध्द संपल्याने सोविएत संघाने अफगाणिस्तानमधून सैन्य माघारी घेतल्याने आशिया खंडातील वातावरण निवळले. पण आंतरराष्ट्रीय पातळीवर एक महत्वपूर्ण घटना घडली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मुलगामी परिणाम घडून आले.

सन 1922 मध्ये अस्तित्वात आलेल्या भौगोलिकदृष्टया जगातील सर्वात मोठे आणि युद्धोत्तर काळात लष्करीदृष्टया दुस ऱ्या क्रमांकाचे राष्ट्र असलेल्या सोव्हिएत संघास सन 1980 च्या दशकात आर्थिक समस्येने ग्रासले. त्यामुळे गोर्बाचेव्ह यांनी 'पुनर्रचना आणि खुलेपणा' हयांचे धोरण जाहिर केल्यापासून सोविएत संघात स्वातंञ्याचे मुक्त वारे वाहू लागले. परिणामी पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटी 1988 ते 1989 पर्यंत धडाधड कोसळल्या. सोविएत रशियातील पुन्हा प्रजासत्ताकावर ही यांचा परिणाम पडत होता. वंशीय दंगली, कामगारांचे मोर्चे, निदर्शने होवू लागली. महागाई, टंचाई, काळाबाजार यांनी रशियात उच्चांक गाठला. सर्वच क्षेत्रातील उत्पादन थंडावले व सोविएत संघ अराजकाच्या उंबरठयावर येवून ठेपला. अशा अवस्थेतच "30 डिसेंबर 1922 राजी लेनिनने स्थापन केलेले सोव्हिएत युनियन 31 डिसेंबर 1991 ला विलय पावले."[15]

या घटनेचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर मुलगामी परिणाम झाला. सोव्हिएत रशियाच्या विघटनाबरोबरच द्विध्रुवी सत्ता समतोलावर (Bipolar

Balance of Power) आधारित शीतयुध्दकालीन विश्वव्यवस्था कोलमडली. यानंतर अमेरिकेशी स्पर्धा करू शकेल अशी दुसरी सत्ता अस्तित्वात राहिली नाही. त्यामुळे अमेरिका ही जागतिक व्यवस्थेची केंद्र बनली. यातूनच सन 1991 साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश (सिनियर) यांनी शीतयुध्दोत्तर काळातील नवीन विश्वरचनेची घोषणा केली. ही विश्वरचना अमेरिकाकेंद्री होती. या नवीन विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षणकर्त्याची (Global Policeman) होती.

जॉर्ज बुश यांची विश्वरचना ही खालील पाच मुद्दयावर आधारित होती.

"आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व, जागतिक पातळीवर शांतता आणि सुरक्षितता टिकवण्याची जबाबदारी अमेरिकेवर असेल, आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून शांतता आणि सुरक्षिततेचे उद्दिष्टय साधले जाईल. या विश्वरचनेत संयुक्त राष्ट्रसंघटनेची भूमिका महत्वपूर्ण असेल, आंतरराष्ट्रीय कायदयाचे उल्लंघन करणा ऱ्या राष्ट्राविरूद्ध सामुहिक सुरक्षिततेच्या तत्वाअंतर्गत कारवाई केली जाईल. आणि अणुचाचणीबंदी, अण्वस्त्र बंदीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातील."[17]

या विश्वरचनेचा जास्त संपूर्ण जगावर परिणाम झाला. त्याचप्रमाणे भारतावरही परिणाम झाला. अमेरिका आर्थिक, लष्करी, महासत्ता म्हणून प्रस्थापित झाली. सोविएत रशियाचे विघटन झाल्यामुळे भारतास आपल्या गरजा

भागविण्यासाठी अमेरिकेशिवाय पर्याय उरला नाही. त्यामुळे भारत- अमेरिका संबंध सुधारणे ही काळाची गरज ठरली.

**श्री. पी.व्ही.नरसिंहराव कार्यकाल : (21 जून 1991 ते 16 मे 1996)**

श्री. व्ही.पी.सिंग आणि श्री.चंद्रशेखर यांच्या अस्थिर सरकारच्या आणि बदललेल्या जागतिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर पी.व्ही.नरसिंहराव यांनी भारताला 1991 ते 1996 असे स्थिर सरकार दिले. शीतयुध्दोत्तर काळात सत्तेवर येणारे हे पहिलेच सरकार होते. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणावर या गोष्टीचा परिणाम पडणे अपरिहार्य होते. अमेरिकेबरोबर संबंध सुधारणे भारताला गरजेचे होते. या काळात बौध्दीक मालमत्ता हस्तांतरणावर तीव्र मतभेद झाले. अशातच भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तंत्रज्ञान हस्तांतरणावरून दोन वर्षाची बंदी घातली आणि भारताच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमावर आक्षेप घेतला. तणाव निर्माण झाला पण "एप्रिल 1992 मध्ये जेष्ठ अमेरिकी लष्करी अधिकाऱ्यांनी भारतास भेट दिली. या भेटीचे फलीत म्हणजे इतिहासात प्रथमच भारत- अमेरिका संयुक्त नाविक कवायती 29 मे 1992 रोजी पार पडल्या."[18]

यामुळे दोन्ही देशातील संबंध सुधारण्यास सुरवात झाली. या काळात विषेशतः लष्करी संबंध सुधारले जे भारताच्या दृष्टीने हिताचे ठरले.

## संयुक्त आघाडी शासन (जून 1996 ते मार्च 1998)

नरसिंहराव यांचा कार्यकाल संपल्यानंतर भारतात पुन्हा अस्थिरता सुरू झाली. या काळात श्री. अटलबिहारी वाजपेयी, श्री. एच.डी.देवीगौडा, श्री. आय.के गुजराल हे या काळात पंतप्रधान झाले. हे देशाला स्थिर सरकार देण्यात अपयशी ठरले. पण एक महत्वाची गोष्ट म्हणजे गुजराल हे परराष्ट्र मंत्री होते. ते पुढे पंतप्रधान झाले. पंतप्रधान झाल्यानंतरही त्यांनी परराष्ट्र खाते स्वत:कडेच ठेवले.

या कालखंडात. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करारावर (CTBT) भारताने स्वाक्षरी करावी यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढत होता. जम्मू काश्मीरमध्ये पाक पुरस्कृत सीमापारदहशतवाद, पाकिस्तानला मिळणारी छुपी अण्वस्त्र सामुग्री आणि तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही या गोष्टींचा भारतीय परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला. त्यामुळे श्री.आय.के गुजराल यांनी "सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करारासारख्या पक्षपाती कराराला विरोध करणे, आपल्या संपूर्ण निशस्त्रीकरणाच्या भूमिकेवर ठाम राहणे, शांतता आणि विकासात्मक कार्यासाठी आपला अणुकार्यक्रम कोणत्याही दबावाशिवाय चालू ठेवणे चीन आणि पाकिस्तान यांच्यातील अण्वस्त्र सहकार्याकडे अमेरिकेसह जगाचे लक्ष वेधणे."[19] या गोष्टींना आपल्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टय बनविले आणि या अनुरूपाने भारत- अमेरिका संबंध विकसीत होत राहिले. याशिवाय अमेरिकेबरोबर संबंध ठेवताना त्यांनी भारताच्या

व्यापारी आणि आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले. या सर्व गोष्टीमुळे श्री. गुजराल कार्यकालामध्ये भारत- अमेरिका संबंध सामान्य राहिले.

**मा.अटलबिहारी वाजपेयी कार्यकाल: (मार्च 1998 ते मे 2004)**

श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली दोन संमिश्र सरकारे या काळात प्रस्थापित झाली. त्यापैकी पहिले सरकार मार्च 1998 ते 1999 या काळात आणि दुसरे सरकार ऑक्टोंबर 1999 ते मे 2004 या कालावधीत सत्तेवर आले. भारतापुढे "जम्मू-काश्मीर वाढता हिंसाचार, दहशतवादयाची घुसखोरी, पाकिस्तान आणि चीनच्या अण्वस्त्र कार्यक्रमामुळे भारतीय सुरक्षेला निर्माण झालेला धोका भारतावर अणुशक्ती विकास कार्यक्रम थांबवावा यासाठी वाढता आंतरराष्ट्रीय दबाव"[20] या गोष्टी अव्हान बनून उभ्या राहिल्या. या अव्हानांना केंद्रस्थानी ठेवून वाजपेयी काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास केला. वाजपेयींनी आपल्या परराष्ट्र धोरणाचे "भारताला अण्वस्त्र संपन्न बनविणे, भारताची संरक्षण सिद्धता वाढविणे, काश्मीरमधील दहशतवादाला आंतरराष्ट्रीय दहशतवादाशी जोडणे, अमेरिकेबरोबर घनिष्ट संबंध स्थापन करणे आणि आशिया खंडात भारताला महासत्ता म्हणून प्रस्थापित करणे."[21] ही उद्दिष्टये ठरविली.

ही उद्दिष्टये गाठणे अमेरिकेच्या सहकार्याशिवाय शक्य नव्हते. त्यामुळे भारत- अमेरिका संबंध या काळात कमालीचे मैत्रीपूर्ण राहिले.

पण 11 व 14 मे 1998 रोजी पोखरण येथे अणुचाचण्या घेतल्यानंतर एकाकी तणाव निर्माण झाला. अमेरिकेने भारतावर निर्बंध घातले. हा तणाव कमी करण्याचे प्रयत्न चालू असतानाच पाकिस्तानने कारगिल भागात घुसखोरी केली. त्यांना हाकलण्यासाठी 20 मे 1999 मध्ये 'ऑपरेशन विजयाची 'घोषणा झाली. यात भारताचा स्पष्ट विजय झाला. पण भारत-अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच अमेरिकेने भारताला पाठिंबा दिला. आणि पाकिस्तानला कारगिल भागातून सैन्य माघार घेण्यास भाग पडले. हा भारताच्या बदललेल्या परराष्ट्र धोरणाचा विजय होता.

याच काळात 12 जून 1998 पासून भारतीय परराष्ट्र मंत्री जसवंतसिंग आणि अमेरिकेचे परराष्ट्र उपसचिव 'स्ट्रोब स्टॉलबोट' यांच्यात चर्चेच्या फे ऱ्या सुरू झाल्या. जून 1998 ते जानेवारी 1999 पर्यंत संरक्षण, अणुप्रसार, निशस्त्रीकरण या विषयावरील 8 फे ऱ्या पूर्ण झाल्या. संबंधात सुधारणा होवू लागली. अमेरिकेने पोखरण अणुचाचणी नंतर लादलेले निर्बंधही सैल केले.

'जसवंतसिंग' आणि 'स्ट्रोब टॉलबॉह' यांनी बिल क्लिंटन याच्या भारत भेटीची पार्श्वभूमी तयार केली होती. त्यानुसार क्लिंटन 20 मार्च ते 24 मार्च 2000 या काळात भारत भेटीवर आले. या भेटीत "दहशतवाद, शिक्षण, पर्यावरण, प्रदुषणमुक्त ऊर्जानिर्मीती. इ. क्षेत्रात सहकार्य करण्यावर भर दिला."[22] यामुळे वाजपेयी कार्यकाळात भारत- अमेरिका संबंधाचे नवे पर्व सुरू झाले.

वाजपेयी काळ दोन्ही देशाच्या दीर्घकालीन संबंधाचा पायाभरणीचा काळ होता. यामुळे भारत- अमेरिका संबंधात वाजपेयी यांचा कार्यकाळ अतिशय महत्वपूर्ण ठरला.

**डॉ. मनमोहनसिंग (कार्यकाळ 2004 पासून पुढे चालू)**

सन 2004 निवडणुकीत 'संयुक्त पुरोगामी आघाडी' सत्तेवर आली मनमोहनसिंग यांनी पंतप्रधान पदाचा पदभार स्विकारला अमेरिकेबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचे धोरण पुढे चालू ठेवले. भारताने अमेरिकेच्या इराकमधील सद्द्राम हुसेन विरोधातील कारवाईला सौम्य विरोध केला. तसेच इराण सरकारच्या अणुकार्यक्रमाविषयीच्या अमेरिकेच्या धोरणाला समर्थन दिले. 11 सप्टेंबर 2001 च्या 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' वर दहशतवादी हल्ला झाला. यानंतर अमेरिकेच्या दहशतवादाविरूध्दच्या धोरणाला भारताने पाठिंबा दिला. तसेच अफगाणिस्तान मधील ओसामा बिन लादेन आणि तालिबान राजवटी विरूध्द कारवाईला समर्थन दिले. याशिवाय जॉर्ज बुश यांनी (Bush- Doctrine) बुश धोरण जाहिर केले. त्याचे मुख्य सुत्र होते, "Either you are with us, or you are with the terriosts"[23] यामुळे भारत-अमेरिका संबंध घनिष्ठ बनले.

शिवाय भारत- अमेरिका लष्करी संबंधात महत्वपूर्ण असणारा 'भारत- अमेरिको-ऑस्ट्रेलिया-जपान-सिंगापूर' या देशाच्या नाविक दलाचा संयुक्त युध्द सराव सप्टेंबर 2007 च्या पहिल्या आठवडयात संपन्न झाला. अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश एप्रिल 2006 मध्ये भारत भेटीवर आले. या

भेटीत 6 एप्रिल 2006 रोजी ऐतिहासिक भारत- अमेरिका नागरी अणुसहकार्य करारही झाला. ही घटना दोन्ही देशाच्या संबंधात मैलाचा दगड ठरली. या करारानंतर जागतिक राजकारणात भारत- अमेरिका संबंधाचे वारे वाहू लागले आणि भविष्यातील सर्वसमावेशक मैत्रीपूर्ण संबंधाचीही पायाभरणी झाली.

भारत- अमेरिका संबंधाचा आढावा घेताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की, दोन्ही देशाना एकमेकांविषयी आस्था होती. यामुळे संबंधात कितीही तणाव वाढला तरी, ते पूर्णपणे कधीच तुटले नाहीत. शीतयुध्दाच्या काळात दोन्ही देशाचे संबंध तणावपूर्ण राहिले. हा शीतयुध्दाचा शाप होता. शीतयुध्द काळात केनेडी प्रशासन काळातच दोन्ही देशाचे संबंध मैत्रीपूर्ण राहिले. शीत युद्ध समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमुलाग्र बदल झाला. अमेरिका जागतिक महासत्ता म्हणून प्रस्थापित झाली. भारताच्या आर्थिक लष्करी तंत्रज्ञानात्मक गरजा भागविण्यासाठी अमेरिकेबरोबर सहकार्य करण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. भारताच्या सर्वांगिण विकासासाठी बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेणे भारताची गरज बनली होती.

पण त्या आधी सन 1971 च्या युध्दाने बांग्लादेशाच्या मुक्तीसंग्रामाने भारत आदर्शवादाकडून वास्तववादाकडे वळला. पंचशील धोरणात बदल करीत भारताने शेजारील राष्ट्राच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप केला. अमेरिकेची आधुनिक शस्त्रसामुग्री पाकिस्तानला मिळून सुद्धा पाकिस्तानचा मोठा

पराभव केला. यामुळे भारत दक्षिण आशियात प्रभावी सत्ता म्हणून प्रस्थापित झाला. यामुळे भारताची दखल घेणे अमेरिकेला भाग पडले.

राजीव गांधी यांनी श्रीलंका आणि मालदीव येथे सैन्य पाठविल्याने भारताच्या धोरणात आक्रमकता आली. बदलत्या राजकीय परिस्थितीत भारत दक्षिण आशियांचे नेतृत्व करू लागला. त्यामुळे जागतिक सत्ता संतुलनात अमेरिकेला भारताच्या सहकार्याची गरज जाणवू लागली. पी.व्ही.नरसिंहराव यांनी भारताच्या आर्थिक धोरणात खाजगीकरण, उदारीकरणाचा स्विकार केला. त्यामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढू लागली. भारताचा विकास दर प्रभावी बनला. ज्याची अमेरिकेला दखल घ्यावी लागली. भारताच्या अण्वस्त्र तंत्रज्ञानविषयीचा विकास अत्यंत प्रभावी होता. जागतिक समुदायाने अनेक निर्बंध घालूनही भारताचा अण्वस्त्र कार्यक्रम ब ऱ्याच अंशी यशस्वी बनला. त्याचबरोबर भारताने अवकाश संशोधनातही ब ऱ्याच अंशी यश मिळविले. सन 1994 मध्ये 'पीएसएलव्ही' या भारतीय बनावटीच्या प्रक्षेपकामुळे परावलंबित्व संपले. वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती करीत असतानाच कृषी क्षेत्रात प्रगती करून भारत स्वयंपूर्ण बनला. अन्नधान्याची आयात करणारा भारत सध्या अन्नधान्याची निर्यात करीत आहे. भारत सर्वच क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी करताना दिसत आहे.

बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत आंतरराष्ट्रीय राजकारणात व्यापारी आणि आर्थिक हित संबंधाना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. भारताची मोठी लोकसंख्या, मध्यम वर्गीयाची मोठी संख्या ही प्रभावी बाजारपेठ म्हणून विकसीत

होत आहे. माहिती तंत्रज्ञानातील कुशल मनुष्यबळात भारत अव्वल स्थानांवर आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य करण्याची भारताप्रमाणे-अमेरिकेचीही गरज बनली आहे. समकालीन राजकारणात ब-याच अंशी लोकशाही व्यवस्था अस्थीर व कमजोर होत असताना भारतात मात्र लोकशाहीचा सदृढ विकास होत आहे. जागतिक पटलावर लोकशाहीच्या संवर्धन आणि संरक्षण करण्याची जबाबदारी एकटी अमेरिका पेलू शकत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर होणारा मानव अधिकाराचा संकोच, हिंसा, जातीय दंगली या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघात आणि बाहेरही अमेरिकेला भारताच्या सहकार्याची गरज आहे. त्यामुळे सद्यकालीन आंतरराष्ट्रीय संबंधात भारत- अमेरिका संबंध सौदार्यपूर्ण बनत आहेत. जी काळाची गरज आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## संदर्भ सूची :

1. रायपूरकर वसंत (2006) आंतरराष्ट्रीय संबंध. श्री. मंगेश प्रकाशन नागपूर पृ.क्रमांक: 2
2. कित्ता पृ.क्रमांक: 2
3. देवळाणकर शैलेंद्र (2007) भारतीय परराष्ट्र धोरण: सातत्य आणि स्थित्यंतर. प्रतिमा प्रकाशन पुणे. पृ.क्रमांक: 269.
4. कित्ता पृ.क्रमांक: 290.
5. कित्ता पृ.क्रमांक: 290.
6. कित्ता पृ.क्रमांक: 269.
7. पाटील एम.पी. (1997) युध्दोत्तर अमेरिका: ट्रूमन ते बुश, मंगल प्रकाशन कोल्हापूर पृ.क्रमांक: 44.
8. कित्ता पृ.क्रमांक: 44.
9. कित्ता पृ.क्रमांक: 54.
10. घई यु. आर आणि घई के.के. (2002) भारतीय विदेश नीति न्यू एकेडेमिक पब्लिशिंग कंपनी, जालंदर. पृ.क्रमांक: 320.
11. कित्ता पृ.क्रमांक: 321.
12. कित्ता पृ.क्रमांक: 165.
13. कित्ता पृ.क्रमांक: 165. युध्दोत्तर - पृ. क्रमांक : 83.

14.पाटील एम.पी. (1997) युध्दोत्तर अमेरिका: ट्रूमन ते बुश, मंगल प्रकाशन कोल्हापूर पृ.क्रमांक: 105.

15.भोळे भा.ल. (2003) भारतीय गणराज्याचे शासन राजकारण. पिंपळापुरे प्रकाशन नागपूर. पृ.क्रमांक: 597.

16.कदम.य.ना. (2001) आधुनिक जग, फडके प्रकाशन कोल्हापूर. पृ. क्रमांक: 308.

17.देवळाणकर शैलेन्द्र (2005) समकालीन जागतिक राजकारण प्रमुख प्रश्न, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद. पृ.क्रमांक: 12.

18.पाटील एम.पी. (1997) युध्दोत्तर अमेरिका: ट्रूमन ते बुश, मंगल प्रकाशन कोल्हापूर पृ.क्रमांक: 117.

19.देवळाणकर शैलेंद्र (2007) भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर. प्रतिमा प्रकाशन पुणे. पृ.क्रमांक: 84.

20.कित्ता पृ.क्रमांक: 90-91.

21.कित्ता पृ.क्रमांक: 92-93-94.

22.कदम. य.ना. (2002) चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी. फडके प्रकाशन कोल्हापूर. पृ.क्रमांक: 182.

23.कित्ता पृ.क्रमांक: 311.